**Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक – १६/०६/२०२४

**दि. १५/०६/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ७४७/२०२४ भा.दं.वि.कलम ३०७, मपोका ३७(१)(३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. १४/०६/२०२४ रोजी २२/३० वा माता लक्ष्मी सुपर मार्केट, पार्क टायटन सोसायटी चे गेटसमोर, शिंदेवस्ती मांरुजी,ता.मुळशी जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/०६/२०२४ रोजी ०७.१६ वा |
| फिर्यादी | :- | लक्ष्मण दुर्गाराम प्रजापती वय- २८ वर्षे रा. शिंदे चौक, पार्क टायटन बिल्डिंगच्या गेटवर किराणा दुकानामध्ये, मारुंजी रोड, हिंजवडी पुणे |
| आरोपी | :- | विष्णु धनराज कोळी वय- २४ वर्ष, रा. साखरे वस्ती रोड, केशव पारधी यांची रुम हिंजवडी पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी यांनी फिर्यादी यांना सिगारेट विक्री करु नको, त्यामुळे माझ्या पान टपरीवर त्याचा परिणाम होत आहे. व तु सिगारेट कमी दराने विकत आहेस त्यामुळे माझ्याकडील सिगारेटची विक्री कमी होत आहे.असे म्हणुन शिवीगाळ केली त्यावेळी माझ्या दुकानात ज्या वस्तु आहेत ते मी विक्री करणार तु मला नको सांगु, माझ दुकान आहे मी सिगारेट ठेवणार, माझा धंदा आहे तो मी करतो, तु तुझा धंदा कर असे फिर्यादी म्हणाले असता, त्याचा राग येवुन चिडुन जावुन तुला संपवतो असे म्हणुन सोबत आणलेला धारदार कटर काढुन फिर्यादीला ठार मारण्याचे उद्देशाने फिर्यादीचे मानेवर उजव्या बाजुला, डाव्या बरगडीवर, उजव्या खांद्यावर कटरने सपासप वार केले वार अडविण्यासाठी फिर्यादीने हात वर केले असता फिर्यादीचे डाव्या हातावर वार करुन गंभीर जखमी केले व ब्रम्हा कोळी यांनी आरोपी याच्या हातातील कटर काढुन घेत असताना झटापटी होवुन दोघांच्या हाताला देखील जखम झाली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि शेळके ९३७१४१९९९९ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ४२६/२०२४ भादवि का.क. ३९२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१५/०६/२०२४ रोजी दुपारी १२.३० वा. चे सु चव्हाण वस्ती येथुन शेतावरुन भोसे गाव चाकण शिक्रापुर रोड |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/०६/२०२४ रोजी २१/०४ वा |
| फिर्यादी | :- | शकुंतला लिंबाजी कुटे वय ७० वर्षे गृहिणी रा. मु.पो. भोसे ता. खेड जि.पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी चव्हाण वस्ती येथुन शेतावरुन भोसे गाव चाकण शिक्रापुर रोडचे दिशेने घरी येत असताना एक अनोळखी इसम काळया रंगाची स्कुटी गाडी नंबर सांगता येत नाही वरुन आला व फिर्यादीचे पाठीमागुन जवळ आला. त्यावेळी फिर्यादीचे गळयातील सोन्याची मणी असलेली पोत मधुन सोन्याचे मणी खाली पडु लागल्याचे लक्षात आले त्यावेळी फिर्यादीने अनोळखी इसमाकडे पाहिले असता आरोपीने फिर्यादीस धक्का देवुन फिर्यादीचे गळयातील ३५,०००/- रु किं ची १ तोळा वजनाची सोन्याची पोत जबरदस्तीने घेवुन गाडीवर बसुन चाकण शिक्रापुर रोडवरुन शिक्रापुर बाजुकडे निघुन गेला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोसई चौगुले ९९२१५२२१८५ |

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ३७७/२०२४ भा द वि कलम ३२४,५०४,५०६,३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१५/०६/२०२४ रोजी १५.१० वा चे सुमारास मौजे सावरदरी ता.खेड जि.पुणे गावचे हददीत असले फोरव्हिया इमेनिशन प्रा.लि.कंपनीचे गेटसमोर

गुन्हा दाखल :- दि.१५/०६/२०२४ रोजी १९.०५ वा

फिर्यादी :- अक्षय उत्तम राठोड वय २३ वर्ष धंदा खाजगी नोकरी रा.स्वप्नील वाघमारे यांचे भाडयाचे रुममध्ये देहुगाव ता.हवेली जि.पुणे मुळ रा.टाकळी ता.जि.धाराशिव

आरोपी :- १)रवी पाटील पुर्णनाव माहित नाही रा.खालुंब्रेता.खेड जि.पुणे
२) दोन इसम पुर्ण नाव पत्ता माहित नाही. **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे फोरव्हिया इमेनिशन प्रा.लि.कंपनीचे गेटसमोर त्यांची मोटर सायकल घेवुन आले असता आरोपी क्रं १ याने गाडीला हात लावुन गाडीची चावी घेत होता तेव्हा फिर्यादीने त्याला रवी काय झाले असे विचारत असतांना आरोपी क्रं १ व त्याचे सोबत दोन अनोळखी इसम यांनी येवुन फिर्यादीस काही एक न बोलता लाथा बुक्यांनी मारहाण करुन फिर्यादीचे जवळ असले हेल्मेटने आरोपी क्रं १ याने फिर्यादीचे डोकीत मारुन किरकोळ व गंभीर जखमी वाईट वंगाळ शिवीगाळ करुन तसेच तुला सोडणार नाही,तुला परत मारणार आहे अशी धमकी देवुन तेथुन पळुण गेले आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा ७५७ मुंढे, ९८२३७२१६०७

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव एमआयडीसी १३७/२०२४भादवीकलम ३०४ (अ),३३७,३३८ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०१/०६/२०२४ रोजी १७/०० वा चे सुमारास मौजे नवलाख उंब्रेगावचे हद्दीत तळेगाव इंडस्ट्रीयल पार्क प्रायव्हेट

गुन्हा दाखल :- दि.१५/०६/२०२४ वेळ १६/०२ वा.

फिर्यादी :- अमरेश उमापती चव्हाण वय-२८ वर्षे व्यवसाय-मजुरी रा.म्हाळसकर ,तळेगाव दाभाडे ता मावळ जि पुणेमुळ रा-नारानायकलतांडाता-देवदुर्गा जि.रायचुर राज्य-कनार्टक

आरोपी :- मोनेश व्यंकटेश पवार वय-२९ मुळगाव हिरापांनतांडा.ता.देवदुर्ग जि.रायचुर सध्या रा.१६ नंबर गल्ली ,वडगावधायरी,पुणे **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांने फिर्यादी व मयत यांचेकडुन गटारिचे भितीस असणारे सिमेट ब्लॉकला प्लास्टर करणेचे काम करुन घेत असताना त्यांना डोकीस हेल्मेट व अंगात रिप्लेक्ट जॅकेट व सेफ्टी बुट अशी साधने न देता व गटारिची बांधणेत आलेली भिंत पडु नये म्हणुन योग्य ती खबरदारी न घेता त्याचे हालगर्जी व निष्काळजीपणामुळे गटारीची भिंत फिर्यादी व मयत इसमाचे अंगावर पडुन त्यामध्ये फिर्यादीचा डावा हात मनगटात व दोन्ही हाताचे खांदे फ्रॅक्चर करणेस व डोकीचे उजवे बाजुस डोळ्याचे खाली मुक्कामार ,हातापायास,पाठीस व पोटास खरचटुन जखमा होउन व कामगार नामे १) रघुनाथ बसावंत साहु २)शंकर किस्तापा राठोड यांचे ही डोकीस मार लागुन त्याचे मरणास कारणीभुत झाला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनिरेळेकर मो.नं.९८२३२५४६७६

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ७२५/२०२४ भा.द.वि. कलम २७९,३३८,३०४(अ) मोटार वाहन कायदा कलम १८४, ११९/११७,१३२(१)(क)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि१३/०६/२०२४ रोजी १९/३० वा. ते १९/५० वाजताचे रागा पॅलेस समोरील रस्त्यावर, विजयनगर काळेवाडी पुणे

गुन्हा दाखल :- दि. १५/०६/२०२४ रोजी १९/१५ वा.

फिर्यादी :- सुनिल नन्दलाल मदान वय-३९ वर्षे धंदा-नोकरी रा.फ्लॅट नं.१३ ए भक्ती पॅरडाईस, बिल्डींग नं.०३, पिंपरी चिंचवड लिंकरोड, गावडे पेट्रोलपंपाजवळ, चिंचवड पुणे.व गट नं.४०७ ते ४१०, फ्लॅट नं.१११ तुलसी रत्न सोसा. ए विंग, मोशी चौकाचे आधी मोशी

आरोपी :- अज्ञात वाहनांवरील चालक

तपशिल :- नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणाहुन यातील फिर्यादीचे वडील नामे नन्दलाल सेवाराम मदान ,वय-६९ वर्षे रा.सदर हे पायी चालत जात असताना अज्ञात वाहनावरील चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने, हयगयीने, अविचाराणे चालवुन फिर्यादीचे वडीलांना धडक देवुन त्याचे डोक्यास गंभीर जखमी करून त्याचे मत्युस कारणीभुत झालेला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- एस.डी.नाईकनिंबाळकर पोलीस उपनिरीक्षक

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ३४७/२०२४ भा.द.वि. कलम- ४४८,३२३,५०४,५०६,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०२/०३/२०२४ रोजी १९/०० ते दि. ०३/०३/२०२४ रोजी सकाळी १०/०० वा ते आजपावेतो प्लॅट नंबर ६,दुसरा मजला,शिवगंगा पार्क सेक्टर १६,चिखली ता.हवेली जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि. १५/०६/२०२४ रोजी १९/३८ वा.

फिर्यादी :- अजित बाबासाहेब सोनवणे वय ३६ वर्षे व्यावसाय नोकरी एचडीबी फायनाशिअल सर्विस लि.रा.आयुष पार्क, दत्त मंदिर जवळ, सेक्टर १६ , राजे शिवाजी नगर चिखली

आरोपी :- १.अनिल गणपत गुंजाळ,२.सुनिता अनिल गुंजाळ ३.मयुर अनिल गुंजाळ रा.माहीत नाही **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी कॅनेरा बॅकेकडुन लिलावादवारे विकत घेतलेला प्लॅट नंबर ६,दुसरा मजला,शिवगंगा पार्क सेक्टर १६,चिखली ता.हवेली जि.पुणे या मिळकतीवर त्यांचा कायदेशीर ताबा असताना यातील आरोपी मजकुर यांनी आप आपसात संगणमत करुन बेकायदेशीरपणे फिर्यादी यांनी खरेदी केलेल्या फ्लॅटचे लावलेले लॉक तोडुन त्यांनी सदर मिळतीवर ताबा घेतला. फिर्यादी यांनी त्यांना हा प्लॅट मी कॅनेरा बॅकेकडुन विकत घेतला आहे व त्यांनी मला ताबा दिला आहे असे सांगितले असता आरोपी मजकुर यांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन धक्काबुक्की करुण तेथुन हाकलुन लावले व तु परत येथे आला तर तुला जिवे मारुण टाकतो व तुझ्यावरच खोटी केस करतो अशी धमकी दिली . त्यानंतर ही फिर्यादी यांनी बरेच वेळा आरोपी क्रं १ यांना मी कॅनेरा बॅकेकडुन प्लॅट विकत घेतला आहे तुम्ही फ्लॅट खाली करा असे सांगितले असता आरोपीने तो प्लॅट माझाच आहे मी खाली करणार नाही तुला काय करायचे ते कर असे म्हणुन धमकी दिली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- एम जी मुळीक पोलीस उप निरी

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- आळंदी १८७/२०२४ भा.द.वि.क ३०७,५०४,५०६(२),मो वा का कलम १९८८ चे कलम ३,४/१८१प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१५/०६/२०२४ रोजी १४ः०० वा.चे सुमारासमौजे वडगाव घेनंद ता. खेड, जि. पुणे गावचे ह्ददीतील गणेश नगर, वडगाव घेंनद,येथील फिर्यादीचे राहते घरासमोर

गुन्हा दाखल :- दि.१५/०६/२०२४ रोजी २१.०० वा

फिर्यादी :- सौ.नाजुका रणजीत थोरात, वय २४ वर्शे, धंदा गृहिणी, रा. गणेष नगर, वडगाव घेंनद, ता. खेड, जि. पुणे

आरोपी :- **विधीसंघर्षित बालक** वय १७ वर्ष रा. गणेश नगर, वडगाव घेंनद, ता. खेड, जि. पुणे

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे घराशेजारी राहणारा विधीसंघर्षित बालक यांने यापुर्वी झालेल्या वादाचा राग मनात धरून त्याचे ताब्यातील चारचाकी वाहन क्र.MH.14/HD.5749 हे अतीवेगात चालवुन थांब तुला गाडी खाली चिरडुन जिवे ठार मारतो असे म्हणत फिर्यादीचे अंगावर गाडी घालुन फिर्यादीस जखमी केले आहे. तसेच फिर्यादीचे पतीला व फिर्यादीस तुला संपवतो असे म्हणुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि साळी सो मो नं ९४०५४०४३४४

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ५७३/२०२४ भा.दं.वि. कलम ३५४,४५२ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१४/०६/२०२४ रोजी सांय १८.३० वाजताचे सुमारास गाधीन्गर पिंपरी पुणे फिर्यादी यांचे राहते घरामध्ये

गुन्हा दाखल :- दि.१५/०६/२०२४ रोजी ०१.३६ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी वय ३७ वर्षे धंदा-घरकाम रा गाधीनगर पिंपरी पुणे

आरोपी :- बंटी ऊर्फ विजय बाबुराव कांबळे , वय ४२ वर्षे रा.गाधीनगर पिंपरी पुणे. **आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हया राहते घरी असतांना यातील आरोपी याने फिर्यादी यांच्या राहते घरात येऊन ''तु मला खुप अवडतेस मी तुझ्यावर खुप प्रेम करतो असे म्हणुन त्याने फिर्यादी यांना त्याच्या जवळ ओढुण त्यांच्या कमरेला व छातीला हात लावुन त्यांच्या स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत केले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- रविंद्र मुदळ पोलीस उप निरी ८०८०६१९२८६

०९.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड २६२/२०२४ भादवि कलम- ४४७,४२७, ३४१,३२३,५०४,५०६ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१५/०४/२०२४ रोजी पासुन ते दि.१३/०६/२०२४ रोजी २१/३० वाजता चे दरम्यान कमला कॉर्नर बिल्डींग, पावर हाउस चौक,मोरया हॉस्पीटलच्या जवळ, चिंचवडगाव,पुणे येथील गाळा नं.१०

गुन्हा दाखल :- दि.१५/०६/२०२४ रोजी १८/ २०वा.

फिर्यादी :- तुषार श्रीरंग शिंदे,वय-४१ वर्षे, धंदा- खाजगी नोकरी, रा. साई सुमन पार्क फलॅट नं.१५, साई शु प्लाझा काळेवाडी रोड,चिंचवड,पुणे.

आरोपी :- अश्विनी अशोक सातपुते, वय-४० वर्ष, धंदा-व्यवसाय रा. अर्शिवाद कॉम्पेक्स,फलॅट नं ५ चौथा मजला, आंबेडकर कॉर्नर, चिंचवडगाव, पुणे

**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे मालकीचा गाळा नं.१० हा इसम नामे -राजेद्र जगताप याला दि.१५/११/२०२२ रोजी लिव्ह अॅन्ड लायसन्सचा करारनामा करुन दि.१४/०९/२०२४ रोजी पर्यत भाडयाने दिलेला असतांना देखील फिर्यादीचे मालकीच्या १० नंबर गाळयाचा बेकायदेशीर ताबा घेण्याचे इरादयाने गाळा नं.१० चे कुलुप तोडुन स्वताचे कुलुप लावल्याने सदरबाबत नमुद आरोपी यांना विचारणा करणे करीता फिर्यादी व फिर्यादीचा भाउ महेश शिंदे,भावजय-अश्विनी शिंदे असे सर्वजण गेलो असता नमुद आरोपी या आमचे अंगावर धावुन येवुन शिवीगाळ करुन "मी दुकानासाठी पैसे् दिले आहेत,तुम्ही इकडे येवुन दुकान उघडणारे कोण आहेत? इकडे आलात तर बघा"असे म्हणुन आम्हाला धमक्या दिल्या आहेत. तसेच परत दि.०१/०६/२०२४ रोजी आरोपी या आमचे अंगावर धावुन येवुन शिवीगाळ करुन तुम्ही इथे यायचे नाही, १० नंबरचे दुकान माझे आहे, तुम्ही इथे परत आला तर तुम्हाला विनयभंगाच्या खोटया केसेसमध्ये अडकविणार अशी धमकी दिली आहे.तसेच दि.१३/०६/२०२४ रोजी फिर्यादीचे मालकीच्या गाळा नं.१० चे वरील बाजुस बेकायदेशीर पत्र्याचे शेड मारतांना फिर्यादीचा भाउ महेश शिंदे हा आरोपी हिस यांना विचारणा करणेकरीता गेला असता आरोपी हिने महेश यास हाताने मारहाण करुन शिवीगाळ केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- दिक्षा झडते, पोलीस उप निरीक्षक ८४८५०६२८७५

१०.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण ४२५/२०२४ प्राण्याचा छळ प्रतिबंधक कायदा कलम ११(१)(अ), ११(१)(ड) व महाराष्ट्र प्राणि संरक्षण सुधारणा अधिनियम १९९५ चे कलम ५(अ), ५(ब) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. १५/०६/२०२४ रोजी १२:३५ वा. चे सुमारास प्राण्यांचा बाजार रोहकल रोड येथे

गुन्हा दाखल :- दिनांक १५/०६/२०२४ रोजी २०/१३ वा

फिर्यादी :- पोशि/२२४३ उदधव खंडु गर्जे, वय ३१वर्षे, नेमणुक चाकण पोलीस ठाणे, पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड

आरोपी :- १) अनिल चंद्रसिंग घोळवे, वय २९वर्षे, व्यवसाय चालक, रा. मु.पो. पिंपळगाव, ता. केज, जि. बिड
२) गणेश मंचिक जगताप, वय २५ वर्षे, व्यवसाय शेती, रा. पिंपळगाव, ता. केज, जि. बीड,
३) शिवाजी नवनाथ डोईफोडे, वय ५२वर्षे, व्यवसाय शेती, रा. नांदुरघाट, ता. केज, जि. बीड
४) धनराज रामचंद्र मुंढे, वय ३० वर्षे, व्यवसाय शेती, रा. पिंपळगाव, ता. केज, जि. बीड

**आरोपी अटक आहेत**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी अशोक लेलंड कंपनीचा बडा दोस्त टेम्पो क्र. एम.एच/२५ ए.के/१९७० वरील चालक आरोपी क्रं १ याने बडा दोस्त या टॅम्पो मध्ये ८०००/- रुपये भाडयाचे पोटी आरोपी क्रं २ ते ४ यांचे एकुण १,६४,०००/- रु कि चे ७ बैले यांना कोणत्याही प्रकारची चारापाण्याची व्यवस्था न करता दाटीवाटीने कोंबुन अखुड दाव्याने बांधुन कत्तलीसाठी घेवुन जात असताना मिळुन आले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोना पाषाणकर ९७०२०८११००

११.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ००/२०२४ भा. द. वि कलम - ३७९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१५/०६/२०२४ रोजी १२.३० वा.ते दुपारी ०१.४५ वा.दरम्यान आळंदी ते भुमकर चौक वाकड दरम्यान पी.एम.पी.एम.एल.बस मध्ये |
| गुन्हा दाखल | :- | ता.१५/०६/२०२४ रोजी १९/०३वा. |
| फिर्यादी | :- | आशा दिलीप मुळे वय ६६ धंदा-काही नाही रा.फ्लॅट नं २ प्रेमदीप सोसायटी सर्वे ६६/०१ वडगांव बु धायरी फाटा सिंहगड रोड पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे आळंदी ते भुमकर चौक वाकड दरम्यान पी.एम.पी.एम.एल.बस मध्ये प्रवास करत असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेवुन फिर्यादी यांची ८०,०००/- रु किं ची २२.५० ग्रॅम वजनाची सोन्याची पाटली कशाचेतरी साहयाने कट करुन चोरुन नेली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | श्री. महादेव यलमार, पोउपनिरीक्षक, |

१२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी ३८२/२०२४ भा.दं.विकलम ३७९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१४/०६/२०२४ रोजी ११:०० वा.चे सुमारास मुंबई ते पुणे बाजूकडे जाणारा हायवे रोडच्याकडेला असलेल्या पी.एम.टी बस स्टॉपवर नाशिक फाटा पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/०६/२०२४ रोजी ०२/२०वा |
| फिर्यादी | :- | ललित शिवालाल शिंगवी ,वय ५२ वर्षे धंदा व्यवसाय रा.प्लॉट नंबर ३८२ सेक्टर २७ अ निगडी प्राधीकरणनिगडी पुणे |
| आरोपी | :- | अनोळखी दोन ते तिन इसम |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पी.एम.टी बस स्टॉपवर नाशिक फाटा पुणे येथे निगडी ते कात्रज पी.एम.टी बस मधुन खाली उतरत असताना. अनोळखी दोन ते तिन इसमांनी गर्दीचा फायदा घेवुन फिर्यादीला धक्का मारुन फिर्यादीचे जिन्स पॅन्टचे डावे खिशातील ५०,२००/- रुपये रोख रक्कम चोरी करुन चोरुन नेले आहेत. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि गुरव ९५२७१९४७३७ |

१३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ३७८/२०२४ भा द वि कलम २७९,३३७,३३८ मो वा का.कलम १८४,१३४ (अ) (ब) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१५/०६/२०२४ रोजी १७.३० वा चे सुमारास मौजे निघोजे गावचे हददीत डोंगर वस्ती महादेव मदिरकमान समोर स्पायसर रोड ता.खेड जि.पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/०६/२०२४ रोजी२२/३५वा |
| फिर्यादी | :- | केशीराम दयाल ठाकुर वय ५६ वर्ष धंदा मजुरी रा.महाळुंगे ता.खेड जि.पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात कंटेनर नंबर माहित नाही |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे निघोजे स्पायसर रोड ता.खेड जि.पुणे येथे पायी चालत असताना पाठीमागुन कंन्टेनर नंबर माहित नाही या वरील चालक याने त्याचे ताबेतील कंटेनर जोरात अविचाराने,हयगयीने,बेधरकारपणे चालवुन फिर्यादीस पाठीमागुन धडक देवुन अपघात करुन अपघातात फिर्यादीचे पाय फ्रक्चर होण्यास व इतर ठिकाणी किरकोळ दुखापतीस कारणीभुत होवुन अपघाताची खबर न देता व औषधोपचारास न नेता पळुन गेला आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा ४८६ जायभाये ८२०८९९०५६० |